दैनिक

अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज




संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध

Email : newsaksharaj2021@gmail.com

आजचा रंग गुलाबी!



वर्ष : ०५ | अंक : ४६, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, मंगळवार, दि.३० सप्टेंबर २०२५ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056


## राज्यातील पूरग्रस्तांच्या मदतीला धावला मुंबईचा सिद्धिविनायक



**अक्षराज : संजय पंडित**

**दि.२९, मुंबई :** राज्यातील अनेक जिल्ह्यांमध्ये मुसळधार पावसामुळे अनेकांचे मोठे नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी भूस्खलन झाले आहे. काही ठिकाणी शेती वाहून गेली आहे तर शेतातील पिकं अक्षरशः कुजली आहेत. अनेकांचे संसार उद्ध्वस्त झाले आहेत. लहान मुलांचे वह्य पुस्तक सर्व काही पुरात वाहून गेले. त्यामुळे पूरग्रस्तांना मदतीची नितांत आवश्यकता आहे. अशा पूरग्रस्त नागरिकांना मदत करणे ही नागरिक म्हणून आपली सर्वांचीच जबाबदारी आहे. म्हणूनच प्रत्येकजण आपापल्या परीने प्रयत्न करताना दिसत आहे. विशेष म्हणजे मोठमोठया मंदिर ट्रस्टकडूवन गरजूंसाठी लाखो रुपयांची मदत पुरवली जात आहे. याआधी पंढरपूरच्या विठ्ठल-रुक्मिणी मंदिराकडून मदत जाहीर करण्यात आली होती. तसेच शिर्डीच्या साईबाबा मंदिर संस्थेकडून मदत मिळाली. शेगावच्या गजानन महाराज मंदिर ट्रस्टकडून मदत जाहीर करण्यात आली. यानंतर आता मुंबईच्या प्रसिद्ध सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टकडून मदत जाहीर करण्यात आली आहे.

मुंबईच्या सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टने राज्यातील गरजू लोकांना तब्बल १० कोटी रुपयांची भरीव मदत जाहीर केली आहे. सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टने तयार केलेल्या प्रसिद्ध पत्रकात याबाबत माहिती देण्यात आली आहे. तसेच ट्रस्टच्या अधिकाऱ्यांनी एक व्हिडिओ देखील प्रसिद्ध करून या संदर्भात निवेदन दिले आहे. मागील काही दिवसांत महाराष्ट्र राज्यातील विविध भागात झालेल्या मुसळधार पावसामुळे गंभीर पूर परिस्थिती निर्माण झाली आहे. नैसर्गिक आपत्तीमुळे अनेक जिल्ह्यातील नागरिकांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर, पूरग्रस्तांना मदत करण्यासाठी, श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर ट्रस्टने मुख्यमंत्री मदत निधीला १० कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे, असे प्रसिद्ध वृत्तपत्राने म्हटले आहे.

महाराष्ट्रावर संकट ओढावलेल्या या आसमानी संकटात शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. संपूर्ण महाराष्ट्र पुराच्या संकटातून झुंजत आहे. त्यामुळे महाराष्ट्र सरकार पुर्ण प्रयत्न देखील करत आहे. भगवान श्री सिद्धिविनायकांच्या चरणी प्रार्थना करतो. महाराष्ट्र या संकटातून लवकर बाहेर पडो. यासाठी श्री सिद्धिविनायक ट्रस्ट बोर्डाने मुख्यमंत्री मदत निधीला १० कोटी रुपये देण्याचा निर्णय घेतला आहे, अशी माहिती सिद्धिविनायक मंदिराच्या विश्वस्तांनी दिली आहे. दरम्यान आतापर्यंत मिळालेल्या माहितीनुसार, मुंबईतील प्रसिद्ध लालबागचा राजा सार्वजनिक गणेश मंडळाने पूरग्रस्तांसाठी ५० लाख रुपयांची आर्थिक मदत जाहीर केली आहे. शेगावच्या गजानन महाराज मंदिर ट्रस्टकडून १ कोटी ११ लाख रुपयांची मदत जाहीर करण्यात आली आहे. आणि पंढरपूरच्या विठ्ठल रुक्मिणी मंदिर ट्रस्टने १ कोटी रुपयांची देणगी जाहीर केली आहे. शिर्डीची साईबाबा मंदिर ट्रस्टकडून १ कोटी रुपये आणि तुळजापूर मंदिर ट्रस्टकडून १ कोटी रुपयांची देणगी जाहीर करण्यात आली आहे.

## संकटाच्या काळात पोलीसांची पूरग्रस्तांना मदत



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.२९, सोलापूर :** जिल्हा पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी वडकबाळ गावाला भेट देऊन पूरग्रस्तांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी पूरग्रस्तांना जेवण व मदतीचे वाटप करण्यात आले. पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी मंद्रूप पोलीस ठाणे हद्दीतील वडकबाळ येथील सीना नदीच्या पूरग्रस्त परिसरास भेट देवून आपत्तीग्रस्त नागरिकांच्या अडचणी जाणून घेतल्या. यावेळी पूरामुळे प्रभावित झालेल्या कुटुंबांना दिलासा देण्यासाठी पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांच्या हस्ते नागरिकांना एक वेळचे जेवण, नाष्टा तसेच उबदार चादरींचे वाटप करण्यात आले. यामुळे पूरग्रस्तांच्या चेहऱ्यावर आश्वासक समाधान आणि धीर निर्माण झाला.

संकटाच्या काळात पोलीस विभाग नागरिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. निसर्गाच्या प्रकोपात धैर्य न हरवता शासन यंत्रणेवर विश्वास ठेवावा, असे आवाहनही पोलीस अधीक्षक अतुल कुलकर्णी यांनी केले. यावेळी तहसीलदार सुजित नरहरे, सहाय्यक पोलीस निरीक्षक मनोज पवार, पोलीस पाटील अशोक पुजारी ग्रामस्थ उपस्थित होते.

यावेळी हवामान खात्याने सोलापूर जिल्ह्यासाठी रेड अलर्ट जारी केलेला असल्याने नागरिकांनी सुरक्षिततेला प्राधान्य द्यावे. अनावश्यक प्रवास टाळावा. नदी-नाले व पाण्याच्या प्रवाहाजवळ जाणे टाळावे. तसेच शासन व प्रशासनाच्या सूचनांचे काटेकोर पालन करावे, असे आवाहन पोलीस अधीक्षकांनी केले.

# यंदा दसऱ्यालाही जोरदार बरसणार पाऊस

## नागपूरसह विदर्भाला यलो अलर्ट; हवामान विभागाचा ताजा अंदाज

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.२९, नागपूर :** बंगालच्या उपसागरात तयार झालेल्या तीव्र कमी दाबाच्या पट्ट्यामुळे राज्यातील अनेक भागांत पावसाने अक्षरश: धुमाकूळ घातला आहे. त्या तुलनेत विदर्भात मुसळधार पाऊस झालेला नाही. मात्र, दमदार पावसाने हजेरी लावली. यामुळे नवरात्रीत अनेक ठिकाणी सुरू असलेल्या गरबा दांडियातील आनंदावर विरजण पडले. आता तर दसऱ्याच्या दिवशीसुद्धा दमदार पावसाची अपेक्षा असून या दिवशी नागपूरसह संपूर्ण विदर्भाला यलो अलर्ट देण्यात आला आहे.

राज्यात आज ३० सप्टेंबरपर्यंत विदर्भ, मराठवाडा, मध्य महाराष्ट्र आणि कोकणात अनेक ठिकाणी दमदार तर काही ठिकाणी अतिवृष्टीचा इशारा देण्यात आला होता. त्यानुसार, गेल्या आठवड्यात नागपूर शहरासह विदर्भात पावसाच्या दमदारी सरींनी हजेरी लागली. यात यवतमाळ व वर्धा येथे पूरस्थिती निर्माण झाली. तसेच या जिल्ह्यांमधील शेतीचेही मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. तसेच इतर जिल्ह्यांमध्येही चांगला पाऊस झाला आहे. त्यामुळे सुरुवातीच्या काळात विदर्भातील काही जिल्ह्यांमधील पर्जन्यमानाची चिंताजनक स्थिती आता बदलली आहे. मात्र, अलीकडेच झालेल्या पावसामुळे ती सुधारली आहे. आता केवळ अमरावती (११ टक्के), अकोला (१० टक्के) आणि गोंदिया (सात टक्के) आणि भंडारा (एक टक्के) या जिल्ह्यांमध्ये तूट आहे. तसेच ही तूट आता चिंताजनक राहिलेली नाही. याखेरीज अन्य जिल्ह्यांत सरासरीपेक्षा अधिकच पर्जन्यमान नोंदविण्यात आले आहे. यात वर्धा येथे सर्वाधिक २० टक्के तर त्याखालोखाल यवतमाळ येथे १८ टक्के, गडचिरोलीत १६ टक्के, वाशीम १५ टक्के, चंद्रपूर १३ टक्के, बुलढाणा येते सात तर नागपूर येथे सहा टक्के अतिरिक्त पावसाची नोंद करण्यात आली आहे. याखेरीज सप्टेंबरच्या अखेरच्या आठवड्यातही पाऊस अपेक्षित असल्याने भंडारा व गोंदियातील तूट भरून निघण्याची आशा आहे.



### दसऱ्याच्या कार्यक्रमांवर सावट !

दसऱ्याला शहरात दोन महत्त्वाचे कार्यक्रम होतात. यात सकाळी रेशीमबाग मैदानावर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा विजयादशमी तर संध्याकाळी दीक्षाभूवरील धम्म चक्र प्रवर्तनाचा कार्यक्रम असतो. या दोन्ही कार्यक्रमांना बरीच गर्दी असते. यंदा संघाच्या शतक महोत्सवी कार्यक्रमासाठी सुमारे २५ हजारांची गर्दी होण्याची शक्यता वर्तविण्यात आली आहे.

तसेच दीक्षाभूमीवरील कार्यक्रमालासुद्धा बरीच गर्दी अपेक्षित आहे. यात पावसामुळे अडचण होण्याची शक्यता असून प्रशासन व पोलिसांनी आवश्यक ती काळजी घेणे अपेक्षित आहे.

# दोन लहान चिमुकल्यांचा मृत्यू : परिसरात हळहळ

## धान्य कीटनाशक पावडर बेतली जीवावर!



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** धान्याच्या पावडरीच्या उग्र वासाने चिमुकल्या दोन सख्या लहान मुलांचा मृत्यू झाला. पारनेर तालुक्यातील ढोकी येथे ही हृदयद्रावक घटना रविवारी दि. २९ सप्टेंबर रोजी घडली. त्याबाबत त्या चिमुकल्यांच्या नातेवाइकांनीच तशी माहिती दिल्याचे पोलिसांनी सांगितले. या घटनेत मृत मुलांची आई सोनाली विठ्ठल धरम ( वय २५) या बेशुद्ध झाल्या असून, त्यांच्यावर अहिल्यानगर येथिल खाजगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. मृत मुलांमध्ये हर्षल विठ्ठल धरम (वय ५ महिने) व नैतिक विठ्ठल धरम (वय ५ वर्ष) अशी मृत्यू झालेल्या चिमुकल्यांची नावे आहेत. सख्या भावाचा दुर्दैवी मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

पोलिसांनी दिलेली माहिती अशी की, शेतकरी विठ्ठल धरम यांनी बाजरीला कीड लागू नये म्हणून गुरुवारी रात्री धान्याची साठवणूक करताना त्यात टाकल्या जाणाऱ्या (सेल्फॉस) पावडरीच्या उग्र वासाने मुलांच्या आईला व चिमुकल्या दोघांनाही त्रास झाल्याचे नातेवाइकांनी सांगितले आहे.

रविवारी पहाटे प्रकृती खालावल्याने त्यांना खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र दोन्ही मुलांची प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना जिल्हा शासकीय रुग्णालयात हलविले, तेथे उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. मृतदेहांवर शवविच्छेदन तपासणी करण्यात आली.

या घटनेने संतप्त झालेल्या नागरिकांनी आणि ग्रामस्थांनी रविवारी दुपारी ४ : ३० वाजता नगर कल्याण महामार्गावर रास्ता रोको केला. त्यानंतर टाकळी ढोकेश्वर येथिल कृषी केंद्रासमोर एक तास ठिय्या आंदोलन केले. यावेळी टाकळी ढोकेश्वर परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. पोलिस निरीक्षक समीर बारवकर,सपोनि नितीन खंडागळे सहाय्यक फौजदार गणेश डहाळे, पो. कॉ. मच्छिंद्र खेमनर,सागर धुमाळ यांनी घटनास्थळी भेट देत नातेवाईकांशी चर्चा करून परिस्थिती नियंत्रणात आणली. यावेळी मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. या घटनेने धान्य साठवणुकीसाठी वापरल्या जाणाऱ्या रासायनिक पावडरच्या सुरक्षिततेबाबत प्रश्न उपस्थित झाले असून पोलिसांनी तपास सुरू केला आहे.

### कृषी सेवा दुकानासमोर ठेवले मृतदेह...

◆मृत नैतिक व हर्षद यांच्यावर ढोकी ग्रामस्थांनी दोन्ही चिमुकल्यांचे मृतदेह कीटकनाशक घेतलेल्या कृषी सेवा दुकानासमोर ठेवून आक्रोश व संताप व्यक्त केला. या घटनेची चौकशीची मागणी केली. पारनेर पोलिसांच्या मध्यस्थीने दोषींवर गुन्हा दाखल करण्याच्या आश्वासनानंतर या दोन्ही चिमुकल्यांवर शोकाकुल वातावरणात रविवारी (दि.२८) सायंकाळी अंत्यसंस्कार केले. रात्री उशिरापर्यंत पारनेर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदविण्याचे काम सुरू होते.

### मृतदेहासह भरपावसात ठिय्या...

◆चिमुकल्यांच्या मृतदेहाच्या शवविच्छेदन तपासणी नंतर संतप्त नातेवाईकांनी मृतदेहासह भर पावसात एक तास टाकळी ढोकेश्वर येथिल कृषी सेवा दुकानासमोर ठिय्या आंदोलन केले. दुकान मालकावर गुन्हा दाखल करण्याची मागणी केली. पोलिस निरीक्षक समीर बारवकर यांनी गुन्हा दाखल करण्याची ग्वाही देत चर्चेअंती हे आंदोलन मागे घेण्यात आले.

# घुग्गुस एटीएम फोड प्रकरणात एक अटकेत, तिघे फरार ! स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई


**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९, चंद्रपूर :** घुग्घुस पोलीस स्टेशन हद्दीत झालेल्या एटीएम कटिंग चोरी प्रकरणाचा पर्दाफाश स्थानिक गुन्हे शाखेने केला असून राजस्थानातील सराईत आरोपीस अटक करण्यात आले आहे तर तीन आरोपीचे शोध सुरू आहे. १५ सप्टेंबर २०२५ रोजी रात्री घुग्घुस हद्दीतील बँक ऑफ महाराष्ट्राच्या पांढरकवडा रोडवरील एटीएम मशीन गॅस कटरने कापून चोरट्यांनी तब्बल १० लाख ९२ हजार ८०० रुपये लांबवले होते. पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या दोन स्वतंत्र पथकांची निर्मिती करून तपास सुरू केला. एक पथक उत्तर दिशेला तर दुसरे पथक दक्षिण दिशेला रवाना करण्यात आले. सलग १३ दिवस दिवस-रात्र तपास करून तब्बल ९०० ते १००० सीसीटीव्ही फुटेजचे विश्लेषण करण्यात आले. तांत्रिक तपास पद्धतींचा वापर करून अथक परिश्रमांनंतर पथकाने आरोपीचा माग काढला.

या प्रकरणी घुग्घुस पोलीस स्टेशन येथे गुन्हा नोंद करण्यात आला होता. घटनेनंतर आरोपींनी पांढऱ्या रंगाच्या बोलेरो वाहनातून येऊन गॅस कटरच्या सहाय्याने एटीएम फोडले असल्याचे स्पष्ट झाले. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन यांनी तत्काळ कारवाईचे आदेश दिले होते. शेवटी तेलंगणातील मंचेरियाल जिल्ह्यातील विंगुर येथून आरोपी जिल्ली सिरदार खान (५२), रा. सबलगड, ता. कामा, जि. भरतपूर, राजस्थान याला अटक करण्यात आले आहे तर आरोपी साजीद खान राजुददीन, रा. भाकडोजी, पो. स्टे. फिरोजपूर झिरका, जि. नुह (हरियाणा), शैकुल उन्नस खान, रा. सावलेर, पो. स्टे. पहाडी, ता. पहाडी, जि. डिग (राजस्थान), काला, रा. गुमटकी, बडकली चौकी, पो. स्टे. नगीना, जि. नुह (हरियाणा) हे फरार झाले आहे. आरोपीला पुढील तपासासाठी घुग्घुस पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे. सदर कार्यवाही पोलीस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, अपर पोलीस अधिक्षक ईश्वर कातकडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अमोल काचोरे यांचे नेतृत्वात सपोनि दिपक कांक्रेडवार, सपोनि बलराम झाडोकार, पोउपनि विनोद भुरले, पोउपनि सुनिल गौरकार, पोहवा सुभाष गोहोकार, पोहवा सतिश अवथरे, पोहवा रजनिकांत पुठ्ठावार, पोहवा दिपक डोंगरे, पोहवा इम्रान खान, पोअं किशोर वाकाटे, हिरालाल गुप्ता, शशांक बादामवार, मिलींद जांभुळे, चापोअं रूषभ बारसिंगे सर्व स्थानिक गुन्हे शाखा, चंद्रपुर तसेच सायबर पोलीस ठाणे, चंद्रपुर यांनी केली आहे.



# संपादकीय



## माणूस आणि यंत्र

भारतीय हवाई दलात सहा दशके सेवा बजावलेली मिग २१ ही बहुचर्चित विमाने दोन दिवसांपूर्वी चंडीगड हवाई दल तळावर समारंभपूर्वक निवृत्त झाली. विमानांनी हवेत तिरंगी धूम्ररेषा उमटविल्या. विमानांचे संचलन पाहण्यास संरक्षणमंत्री राजनाथसिंह उपस्थित होते. हवाईदल प्रमुख एअरचीफमार्शल अमरप्रीतसिंग हे 'मिग २१'च्या अखेरच्या उड्डाणात वैमानिक म्हणून सहभागी झाले होते. ज्या उडत्या यंत्राच्या अंगाखांद्यावर आपण खेळलो, वाढलो त्या यंत्राला हवाईदल प्रमुख या नात्याने निरोप देताना वायुवीराच्या मनात हळवे भाव दाटून येणे स्वाभाविकच.

यानिमित्ताने विविध वायुवीर, नौदल अधिकारी, सैनिक यांचे त्यांनी सेवा बजावलेल्या युद्धनौका, उडविलेली विमाने, नेतृत्व केलेले रणगाडे यांच्याशी कसे नाते तयार होत असेल, याविषयी वेळोवेळी झालेल्या संवादाचे स्मरण झाले. यंत्रे कितीही प्रगत झाली, तरी ती हाताळणारा सैनिक, त्याचे कौशल्य, त्याची चिकाटी, जिगर हे महत्त्वाचे, असे सैनिकी क्षमतांबाबत म्हटले जाते, ते तर खरेच. यंत्रांच्या कितीही मर्यादा असल्या, तरी आपल्या भारतीय सैनिकांनी त्यावर मात करून ईर्षेने विजयश्री खेचून आणली, असे अनेक प्रसंग आहेत. तरीही शेवटी यंत्रांवर सैनिकाची भिस्त असतेच, त्यामुळेच या यंत्रांशी त्यांचे भावनिक नाते दृढ होत जाते. मिग २१ विमानांचेच उदाहरण द्यायचे, तर ६३ वर्षांमध्ये ८०० हून अधिक विमानांनी भारतीय हवाई दलातील अनेक पिढ्या पाहिल्या, घडविल्या. अशा विमानाला ताफ्यातून निरोप देताना कित्येक हवाई दल अधिकाऱ्यांच्या डोळ्यांसमोर आपल्या सैनिकी आयुष्याची कारकीर्दच उभी राहिली असेल. यानिमित्ताने २०१५मधील आयएनएस गोदावरी या फ्रिगेटची व २०१७ मधील 'आयएनएस विराट'ची सेवानिवृत्ती यांचे स्मरण झाले. भारतातच आरेखन केली गेलेली पहिली स्वदेशी बांधणीची युद्धनौका हे आयएनएस गोदावरीचे वैशिष्ट्य. तर जगभरात ५९ वर्षे इतका सर्वाधिक काळ पाण्यात तरंगती राहिलेली (त्यापैकी ३० वर्षे भारतात) विमानवाहू युद्धनौका असे, विराटचे योगदान.

युद्धनौकांचे सारथ्य केलेल्या सर्व कमांडिंग ऑफिसरना या निवृत्ती सोहळ्याचे खास निमंत्रण असते. सूर्यास्ताच्या साक्षीने तिरंगा, नौदलाचा ध्वज व निवृत्तीच्या दिवशी धारण केलेला विशेष ध्वज खाली उतरवून बँडच्या धुनेवर या नौकांना आदरपूर्वक निरोप दिला जातो. कित्येक विमाने किंवा युद्धनौकांचा सेवेचा कालावधी हा सैन्याधिकाऱ्यांच्या सैनिकी कारकीर्दीला समांतर असतो. लढाऊ विमानांची तुकडी असो किंवा युद्धनौका; त्यांच्या स्वरूपानुसार प्रत्येक यंत्रालाही एक प्रथा, परंपरा व त्यांची वैशिष्ट्यपूर्ण कार्यसंस्कृती असते. त्या त्या वेळी त्यांच्यावर स्वार झालेले अधिकारी त्या युद्धनौकांची किंवा विमानांच्या तुकडीची कार्यसंस्कृती अंगी धारण करतात व त्याच बलस्थानांमुळे ते ओळखले जातात. मिग २१च्या पँथर्स किंवा कोब्रा या स्क्वाड्रन असोत, किंवा राजपूत श्रेणीतील युद्धनौका म्हणजे आर क्लास, १९७१ च्या युद्धात प्रथम आघाडी उघडलेल्या कॉर्व्हेट श्रेणीतील क्षेपणास्त्र नौका म्हणजे किलर स्वाड्रन अशा विविध नावांनी त्यांची ओळख असते. ते एक ईर्षेचे बीज असते. बहुधा त्यामुळेच नौदलातील युद्धनौका या भौतिकदृष्ट्या निवृत्त झाल्या, तरी त्यांचे प्राण कायम राहतात, असे मानले जाते. यानुसार नव्या आधुनिक पिढीतील युद्धनौका पुन्हा जुन्या नावानेच पुनर्जन्म घेतात. परंतु जेव्हा सामग्री व निधीच्या टंचाईमुळे किंवा नियोजनातील समस्यांमुळे एकच एक यंत्रे पुनःपुन्हा वापरावी लागतात, काही तरी जुगाड चालवून त्यांची आयुर्मर्यादा ओढूनताणून लांबवावी लागते, तेव्हा मात्र ते सैनिकांच्या जिवावरच बेतते. अशा वेळी याच यंत्रांना मग उडत्या शवपेट्यांसारखे दूषण चिकटते. विहित कालावधीच्या पलीकडे माणूसही जगत नाही; मग यंत्रे चालविण्याचा आटापिटा केल्यावर तीही मान टाकतात किंवा माणसाच्या जिवाचीच परीक्षा पाहतात. हे टाळता आले, तर यंत्र आणि माणूस दोघांचे प्राण वाचविता येतील.




# भारतच आशियाचा राजा !!

रविवारी दुबईत झालेल्या आशिया चषकाच्या अंतिम सामन्यात पारंपरिक प्रतिस्पर्धी पाकिस्तानचा ५ विकेट्सने धुव्वा उडवत भारताने आशिया चषकावर विक्रमी नवव्यांदा नाव कोरत इतिहास रचला. विशेष म्हणजे या स्पर्धेत भारताने पाकिस्तानचा सलग तीनदा पराभव करत हॅट्रिक साजरी केली. रविवारी खेळल्या गेलेल्या अंतिम सामन्यात भारताच्या फिरकी गोलंदाजांनी त्यातही कुलदीप यादवने अप्रतिम गोलंदाजी करत पाकिस्तानच्या फलंदाजांची पळता भुई थोडी केली. कुलदीप यादवने अंतिम सामन्यात भेदक गोलंदाजी करताना अवघ्या ३० धावात ४ बळी मिळवले. विशेष म्हणजे त्याने आपल्या चौथ्या षटकात पाकिस्तानचे तीन फलंदाज बाद केले. त्याला वरुण चक्रवर्ती, अक्षर पटेल, जसप्रीत बुमरा यांनी चांगली साथ दिली. या तिघांनी प्रत्येकी २ बळी मिळवत श्रीलंकेला अवघ्या १४६ धावात रोखले. विशेष म्हणजे पाकिस्तानने त्यांच्या डावाची सुरुवात धमाकेदार केली. त्यांच्या सलामीच्या जोडीने धडाकेबाज सुरुवात करून भारतीय गोलंदाजांना चकित केले. ९ धावांच्या सरासरीने त्यांनी धावा काढल्या मात्र १ बाद ११३ अशा सुस्थितीतून त्यांची घसरगुंडी उडाली. वरुण चक्रवर्तीने दुसरा बळी मिळवल्यावर पाकिस्तानची गाडी रुळावरून घसरली. भारताच्या फिरकी गोलंदाजांनी आपल्या धारधार गोलंदाजिने पाकिस्तानच्या फलंदाजीचे कंबरडे मोडले. अवघ्या ३३ धावात भारताने पाकिस्तानचे ९ फलंदाज बाद केले. भारताच्या फिरकी गोलंदाजीपुढे पाकिस्तानची फलंदाजी पत्त्याच्या बंगल्याप्रमाणे कोलमडली आणि पाकिस्तानचा संघ पूर्ण २० षटके देखील खेळू शकला नाही. १४७ धावांचे आव्हान घेऊन मैदानात उतरलेला भारतीय संघ किती षटकात विजय मिळवणार असाच प्रश्न विचारला जात होता मात्र पाकिस्तानच्या गोलंदाजांनी भारताचे पहिले तीन फलंदाज स्वस्तात बाद करून क्रिकेटप्रेमींची धाकधूक वाढवली मात्र भारताचा मधल्या फळीतील युवा फलंदाज तिलक वर्मा याने एक बाजू लावून धरत शानदार अर्धशतक झळकावले त्याला यष्टिरक्षक संजू सॅमसन आणि अष्टपैलू शिवम दुबेने चांगली साथ दिली. त्यामुळे भारताने सहज विजय मिळवला आणि १४५ कोटी देशवासीयांना विजयादशमीची गोड भेट दिली. भारतीय संघाने सर्वाधिक ९ वेळा आशिया चषकावर मोहोर उमटवत आपणच आशियाचा राजा आहोत हे सिद्ध केले. भारताने या स्पर्धेत अप्रतिम कामगिरी केली. गोलंदाजी, फलंदाजी आणि क्षेत्ररक्षण या तिन्ही आघाड्यांवर भारतीय खेळाडूंनी चांगली कामगिरी केली. भारताच्या सर्वच खेळाडूंनी चांगली कामगीरी करून आपण फॉर्मात असल्याचे दाखवून दिले. अभिषेक शर्मा, शुभमन गिल, तिलक वर्मा, हार्दिक पांड्या, संजू सॅमसन या भारताच्या सर्वच फलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली. सूर्यकुमार यादवने फलंदाजीत चमकदार कामगिरी केली नसली तरी त्याने संघाचे नेतृत्व कुशलतेने केले. गोलंदाजीतही बुमराह, कुलदीप यादव, वरुण चक्रवर्ती, अर्शदीप सिंग, हार्दिक पांड्या, अक्षर पटेल यांनी चांगली कामगिरी केली. शिवम दुबेने दमदार अष्टपैलू कामगिरी केली. कुलदीप यादव तर या स्पर्धेत भारताचा ट्रम्पकार्ड बनला होता त्याची फिरकी प्रतिस्पर्धी संघातील कोणत्याच फलंदाजाला समजली नाही. त्याने या स्पर्धेत सर्वाधिक १७ बळी टिपले. ही स्पर्धा भारतीय संघासाठी खूप महत्वाची होती कारण ऑपरेशन सिन्दुर नंतर भारत पहिल्यांदाच पाकिस्तान समोर उभा ठाकणार होता. त्यामुळे ही स्पर्धा जिंकून भारतीय खेळाडू पहलगाम हल्ल्यातील शहीदांना श्रद्धांजली वाहतील आणि भारतीय सैनिकांना मानवंदना देतील ही अपेक्षा होती अखेर ती खरी ठरली. भारतीय संघाने एकदा नव्हे तर तीनदा पाकिस्तानला चारी मुंड्या चित करून पहलगाम हल्ल्यातील शहिदांचा मैदानात बदला घेतला. संपूर्ण स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी पाकिस्तानी खेळाडूंशी हातमिळवणी केली नाही इतकेच नाही तर अंतिम सामन्यात विजय मिळवल्यानंतर पाकिस्तानी क्रिकेट बोर्डाच्या अध्यक्षांच्या हस्ते ट्रॉफी स्वीकारण्यास नकार देत पहलगामवर भ्याड हल्ला करणाऱ्या पाकिस्तानचा कृतीतून निषेध व्यक्त केला. भारतीय संघाच्या या कृतीने देशवासीयांची मने जिंकली. भारताने जरी ट्रॉफी स्वीकारली नसली तरी आशिया चषकाचा अंतिम सामना जिंकत भारतच आशियाचा राजा आहे हे सिद्ध केले. **आशिया चषक विजेत्या भारतीय संघाचे मनापासून अभिनंदन !**




**श्याम ठाणेदार**
**दौंड जिल्हा पुणे**
**मो.९९२२५४६२९५**

# पाकिस्तानातील हिंग्लजा देवी गडहिंग्लजमध्ये कशी...?

**◆पाकिस्तानाच्या बलुचिस्तान प्रांतातील हिंगोल नदीच्या तीरावर मकरान टेकड्यांमधील एका गुहेत हिंग्लजा देवीचे मंदिर आहे. हे मंदिर ५१ शक्तिपीठांपैकी एक मानले जाते. पाकिस्तानी हिंदू आणि मुस्लीम या तीर्थस्थळाच्या दर्शनाला जातात. मुस्लीम भाविक या देवीला नानी बीबी या नावाने ओळखतात..!!**



पाकिस्तानात हिंदू-मुस्लीम ऐक्याचे प्रतिक म्हणून या मंदिराला ओळखले जाते. हिंग्लजा देवीच्या मंदिराला पाकिस्तानी सरकारने संरक्षण दिलेले आहे. इथे दर्शन घेण्यासाठी आधी परवानगी काढावी लागते.या देवस्थानच्या उत्पत्तीची कहाणी पुराणातसुद्धा सांगितली आहे. दक्ष राजाने एक मोठे यज्ञ आरंभले होते, पण या यज्ञाला आपल्या जावयाला म्हणजेच भगवान शंकर महादेवाला आमंत्रण दिले नव्हते. नवऱ्याचा हा अपमान सहन न झाल्याने सतीने याच यज्ञात स्वतःची आहुती दिली. चिडलेल्या शंकराने तिचे अर्धवट जळलेले शरीर आपल्या पाठीवर टाकले आणि उद्विग्न अवस्थेत तो इतरत्र भटकू लागला. त्याच्या फिरण्याने देवीच्या शरीराचे एक-एक तुकडे पृथ्वीवर पडत गेले. या प्रत्येक ठिकाणीएक-एक शक्तिपीठ वसले आहे.सतीचे शीर बलुचिस्तानमध्ये पडलेआणि आज तिथे हिंग्लजा भवानीदेवीच मंदिर आहे. दरवर्षी एप्रिल महिन्यात या देवीची यात्रा असते. कराचीमधून यात्रेकरू हिंग्लजादेवीच्या यात्रेला पायी निघतात. अख्ख्या पाकिस्तानातून




व भारतातूनही भाविक येथे येतात. मुस्लीम यात्रेकरू या देवीच्या यात्रेला 'नाणी की हज' असे म्हणतात. १५० किमी अशी ही यात्रा असते. यात्रेच्या वेळी पंचवीस-तीस हजार भाविक गडावर हजर असतात. हिंग्लजा देवी ही भारतातल्या भवसार, बरोट, सोमवंशी क्षत्रिय समाजाची कुलदेवता समजली जाते. या देवीचे अनेक भक्त गुजरात, राजस्थान, पंजाब या सीमावर्ती भागात आढळतात.या देवीचा कोल्हापूरच्या गडहिंग्लजशी काय संबंध?गडहिंग्लज जवळ भडगाव येथे या देवीचे मंदिर आहे. एका निसर्गरम्य टेकडीवर असलेल्या या मंदिरात हिंगुळाई देवी किंवा गुड्डाई देवी म्हणून तिला ओळखले जाते. आता ही देवी पाकिस्तानातून इकडे कशी आली याची सुद्धा एक कथा सांगितली जाते.

इराण, बलुचिस्तान, अफगाणिस्तानमध्ये हिंग पिकते. ती हिंग विकायला बलुची व्यापारी तिकडून भारतात यायचे. या हिंग व्यापाऱ्यांनी ते जिथे जिथे जातील तिथे त्यांनी हिंग्लजा देवीची मंदिर स्थापन केली. राजस्थानमधील हिंग्लजागढ असेल किंवा कर्नाटकातील गुलबर्गा जिल्ह्यात देखील हिंग्लजा देवीची मंदिरे आहेत. महामुंबईमधील चौल बौध विहारमध्ये सुद्धा हिंगुळा देवीच मंदिर आहे. याच देवीच्या नावावरून कोल्हापूर जिल्यातील गडहिंग्लज तालुक्याला सध्याचे गडहिंग्लज हे नाव मिळाले.

## सिध्द दाती..



महादेवी सिध्ददात्री
रे रुप नववे नवराती
अष्ठसिध्दी शंकराले
तुज मुळे होई प्राप्ती

अर्धनारीनटेश्वर नाम
नटराजाला देई उक्ती
मना मना करे वसती
शिवा सहीत पार्वती

नवरात्री सु संपन्नता
शांतरुप आदि शक्ती
भक्ता देती सिध्दता
चराचरी तव व्याप्ती

कमलस्थिता भार्गवी
आळविती श्रीसुक्ती
चतुर्भुजा कमलधारी
कमलनयनी आकृती

शंखचक्रगदाधारीणी
शब्दातीत ती महती
तांदूळ शिरा नैवैद्या
भवानीला अतिप्रिती

अलौकिक भावभक्ती
मातेची लेकरा प्रिती
सतत काळजी वाहते
आदिमाता लेकराप्रती

कुमारिकेचे पुजनांती
इतिश्री करे नवराती
सुखी कर समस्तजन
आर्त मनातून प्रार्थती

**- हेमंत मुसरीक, पुणे**
**मो.९७३०३०६९९६**

# वेड असावे पण किती ? याचे तारतम्य बाळगणे गरजेचे...
# अभिनेता विजय थलपतींच्या रॅलीत चेंगराचेंगरी...

एखाद्या व्यक्तीबद्दल किती आकर्षण असते याची प्रचिती नुकताच तमिळनाडूमधील राजकारणी आणि अभिनेते विजय थलपती यांच्या करुर येथील राजकीय रॅली दरम्यान झालेल्या चेंगराचेंगरीतील घटनेवरुन अधोरेखित होते घटनेमध्ये ४० हुन अधिकजन आपला प्राण गमावला आहे तर अनेकजण जखमी आहेत तमिळनाडूमध्ये चित्रपट कलाकारांना मिळणारे स्थान केवळ स्टारडम पुरते मर्यादित नसून तेथे त्यांना दैवत मानले जाते याही पुढे जाऊन दक्षिणेत अनेक अभिनेत्यांची मंदिरे बांधली आहेत हे पराकोटीचे वेडचं म्हणावे लागेल प्रशासनाची बेफिकीरी, आयोजकांची चुकीची गणिते आणि अंधभक्तीचे अनियंत्रित रुप यामुळे अनेकांचे प्राण गेले वेड असावे पण किती याला काही मर्यादा असाव्यात नाहीतर आशा घटनांना सामोरे जावे लागते अभिनेते विजय थलपती यांनी मृतांच्या कुटुंबीयांना प्रत्येकी २० लाख आणि जखमींना २ लाख रुपयांची मदत जाहीर केली आहे दरम्यान या दुःखद प्रसंगी आपल्या प्रियजनांना गमावल्याच्या वेदना व्यक्त करायला त्यांच्याकडे शब्द नव्हते अभिनेते विजय थलपती यांना पाहण्यासाठी एवढी उच्चांकी गर्दी झाली होती विजय यांच्या रॅलीत जमलेली गर्दी राजकीय कार्यकर्त्यांची नव्हती तर सिनेमाच्या वेडाने पछाडलेली होती तामिळनाडूमतील हे वेड नवीन नाही दिवंगत एमजी रामचंद्रन, आंध्रचे माजी मुख्यमंत्री एन. टी. रामराव जयललिता आणि सद्या राजकारणात सक्रिय असलेले कमल हासन अशा अनेक नेत्यांनी अभिनयाच्या बळावर नंतर राजकारणात येवून राज्यावर राज्य केले आहे त्यांच्या मागे हजारोंचा जनसमुदाय असतो जो काहिही करण्यास तयार होतो अगदी वेळ पडली तर प्राण त्यागण्यासही किती हे वेड याची प्रचिती येते भविष्यात आशा घटना टाळायच्या असतील तर सामाजिक सजगता, सुरक्षित व्यवस्थापन आणि या दैवतीकरणांवर टाच आणली पाहिजे तर आणि तरच अशा घटनांना पायबंद बसेल !


**- राजू जाधव, मांगूर जि. बेळगांव**

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

# थोडक्यात

## पालम तालुका ओला दुष्काळ जाहीर करा

### तालुका काँग्रेस कमिटीचे तहसीलदारांना निवेदन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२९, पालम (परभणी) :** पालम तालुक्यात परतीच्या पावसाने कहर माजवलेला आहे. शेतकऱ्यांचे मोठया प्रमाणात नुकसान झाले असल्याने पालम तालुका ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये तात्काळ मदत द्या. यासह विविध मागण्याचे निवेदन पालम तालुका कांग्रेस कमिटीच्या वतीने तहसीलदार यांना दिले. पालम तालुक्यात दिनांक २६ व २७ सप्टेंबर रोजी प्रचंड मोठ्या प्रमाणात पाऊस झाल्याने सर्वत्र पूर परिस्थिती निर्माण झाली होती. यामुळे संपुर्ण जनजिवन विघ्कळीत झाले आहे. अनेकांच्या घरात दोन ते तीन फुट पुराचं पाणी शिरल्यामुळे अनेकांचे संसार उघड्यावर पडले.पिकांचे आतोनात नुकसान झालेले आहे. शेती सर्व पाण्याखाली बुडाले असून शेतीला तळ्याचे स्वरूप आल्याने सर्व पिके पाण्याखाली गेली आहेत. जनावराचे सुध्दा बेहाल झालेले असून त्यांना थारा नाही, चारा पाणी नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली असून शासनाने परिस्थितीची गंभीर दखल घेऊन मराठवाड्यासहीत पालम तालुक्यात ओला दुष्काळ जाहीर करावा, सरसगट शेतकऱ्यांना हेक्टरी ५० हजार रुपये अनुदान द्यावे, संपूर्ण पीक विमा लागू करण्यात यावा व संपूर्ण शेतकऱ्यांची कर्जमाफी करण्यात यावी. जनावरांना चाऱ्याची सोय करण्यात यावी, कामगार व भुमीहीनांना आर्थिक मदत करण्यात यावी. अशा आशयाचे निवेदन सादर केले. सदरील निवेदनावर काँग्रेस कमिटीचे माधव फाजगे, अकबर पठाण, आबरार काजी, हबीब चाऊस, साबेर खुरेशी, मंचकराव गायकवाड, गोपीनाथ देशमुख, जाफर पठाण, बाळकृष्ण चाळक, कामाजी गायकवाड, तुकाराम पाले, रुस्तुमखा पठाण, गोविंद दासरवाड, मुरलीधर मरपडवाड, गोरख दासरवाड, संदेश कुलकर्णी,अंबादास ठाकूर, इत्यादीच्या सह्या आहेत.

## कोपरखैरणे परिसरातील भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना त्रास



**अक्षराज : महादेव चव्हाण**

**दि.२९, नवी मुंबई :** कोपरखैरणे परिसरातील भटक्या कुत्र्यांचा नागरिकांना दिवसेंदिवस त्रास सहन करावा लागत आहे. दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी घटना रिलायन्स तसेच जिओ मार्ट कर्मचाऱ्याचा चावा घेतला. रस्त्यावरून फिरणारे भटके कुत्रे ही शहरी भागातील एक गंभीर समस्या बनलेली आहे. या भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्लूयात अनेकजण जखमी झाले आहेत. तर अनेक लहान मुलं भटक्या कुत्र्यांनी केलेल्या हल्लूयात आज पर्यंत मृत्युमुखी पडलेली आपण पाहिलेली आहेत. त्यामुळे रात्री अपरात्री आणि अगदी दिवसाढवळ्या ही भटक्या कुत्र्यांचा उपद्रव असलेल्या भागातून लोकांना जीव मुठीत धरून जावं लागतं. दरम्यान, आता सर्वोच्च न्यायालयाने भटक्या कुत्र्यांविरोधात सक्त भूमिका घेतली आहे. तसेच रस्त्यावरून मोकाट फिरणाऱ्या भटक्या कुत्र्यांना डॉग शेल्टर होममध्ये ठेवण्याचे आदेश दिले आहेत.आता कोपरखैरणे परिसरातून घटना घडली आहे. सदर रिलायन्स जिओ मार्ट चा डिलिव्हरी पार्टनर सुरज पाटील यास वाहन चालवत असताना अचानक भटके कुत्रे धावून त्याचा चावा घेतला त्यास गंभीर असे दुखापत झाले आहे. सदर ही घटना दुपारी २ वाजता गणपती विसर्जन तलाव सेक्टर १९ येथे घडली असून तात्काळ त्यास प्राथमिक उपचार करून दवाखान्यात उपचारासाठी पाठवले आहे.

## कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या वतीने नारीशक्ती रॅली संपन्न



**अक्षराज : दत्ता हमंद**

**दि.२९, कुंडलवाडी (नांदेड) :** कुंडलवाडी पोलीस ठाण्याच्या वतीने सोमवार, दिनांक २९ सटेम्बार २०२५ रोजा नारीशक्ती रॅली उत्साहात व आनंदात पार पडली. महिला सबलीकरण आणि महिलांविषयीच्या कायद्यांबाबत जागृती निर्माण करणे. हा या रॅलीचा प्रमुख उद्देश होता. या रॅलीचे उद्घाटन क्रांती डोंबे, उपविभागीय अधिकारी, बिलोली यांच्या हस्ते झाले. के.रामलू इंग्लिश मीडियम स्कूलच्या विद्यार्थ्यांनी पथनाट्य सादर करून समाजातील महिलांच्या प्रश्नांवर प्रकाश टाकला. तसेच पूजा ठोमसे आणि आरती मोकळे यांनी महिला सबलीकरणाविषयी मार्गदर्शन केले. विद्यार्थ्यांच्या पथनाट्यामुळे रॅलीला विशेष आकर्षण प्राप्त झाले. या रॅलीत महिला व विद्यार्थिनींचा उत्स्फूर्त सहभाग होता. हरिभक्त पारायण कान्होपात्रा ताई यांनी महिला व नारीशक्तीचे महत्त्व स्पष्ट केले, तर वैद्यकीय अधिकारी डॉ. सारिका अनमुलवाड यांनी आरोग्यविषयक माहिती दिली. सहायक पोलीस निरीक्षक ज्ञानेश्वर शिंदे यांनी सांगितले की, नारीशक्तीचा पुढाकार वाढविण्यासाठी तसेच कायदेविषयक माहिती सर्वांपर्यंत पोहोचावी, यासाठी ही रॅली आयोजित करण्यात आली आहे. माजी नगराध्यक्ष सुनील बेजगमवार यांनी या रॅलीमुळे समाजात सकारात्मक वातावरण निर्माण होईल असे प्रतिपादन केले. चेअरमन व प्रतिष्ठित व्यक्ती साईनाथ उत्तरवार यांनी देखील आपले विचार व्यक्त केले. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष मुकेश जोशी, पत्रकार संघाचे अध्यक्ष दत्ता हमंद हे उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ.नरेश बोधनकर यांनी केले, तर आभारप्रदर्शन पोलीस उपनिरीक्षक गजेंद्र मांजरमकर यांनी केले. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. कुंडलवाडी पोलीस स्टेशनच्या वतीने काढलेल्या या रॅलीचे सर्वत्र कौतुक होत आहे. रॅलीच्या यशस्वीतेसाठी महिला दक्षता समिती व के.रामलू शाळेच्या शिक्षिका दाक्षायानी व अर्चना नरोड यांनी विशेष परिश्रम घेतले.

## श्रीकालेजी देवी मंदिरात श्रीस्वामी समर्थ भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम संपन्न

**अक्षराज : साहेबराव गागलवाड**

**दि.२९, मुदखेड (नांदेड) :** मुदखेड येथील ग्राम दैवत असलेल्या श्री रेणुका मातेचे प्रतिरूप श्रीकालेजी देवी मंदिरात सप्तमिच्या दिवशी भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. वर्ष परंपरेने नवरात्रातील नऊ दिवस विवीध भक्तीमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे. सोमवारी श्रीस्वामी समर्थ भजन मंडळ बापुसाहेब नगर' सन्मित्र कॉलनी भजनी मंडळाकडून भजनाचा दणदणीत कार्यक्रम पार पडला. देवीची आराधना करताना भजन महिला भक्तांनी श्रीकालेजी देवीची, महादेवाची आणि विठ्ठलाच्या भजनाने मंदिर परिसरात भक्तीचे वातावरण निर्माण झाले होते. श्रीरेणुकादेवी श्रीकालेजी देवीच्या भक्तांनी भजनी मंडळाला भरभरून प्रतिसाद दिला आहे. शेवटी देवीच्या नावाने जोगवा मागितला गेला. त्यामध्ये जोगव्याच्या स्वरूपात भक्तांकडून देणगी देण्यात आली होती. त्याचबरोबर भक्तांकडून महिला भजनी मंडळाला दाद म्हणून बक्षिस स्वरूपात देणगी दिली आहे. श्रीस्वामी समर्थ भजन मंडळा कडून बक्षिस व जोगवा मागताना जमा झालेली रू.१०५०० रक्कम श्रीकालेजी देवीला अर्पण केली आहे. देवस्थानाकडून श्री स्वामी समर्थ भजनी मंडळाचा सत्कार करण्यात आला असून देवीच्या सर्व भक्तांकडून भजनी मंडळाला उस्फुर्तपणे साथ दिली व भक्तीमय वातावरणात भजनाचा आनंद घेतला.

## अहिल्यानगर मध्ये खासदार लंके यांच्याकडून पूरस्थितीची पाहणी



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, अहिल्यानगर :** मागील २४ तासांत तब्बल १३० मिमी पावसाची नोंद झाल्याने शहर व परिसरात सीना नदीला पूर आला आहे. परिणाम नालेगाव, दातारंगे मळा, सताळकर मळा यांसह अनेक भागांत नागरिकांच्या घरात पाणी शिरून जनजीवन विस्कळीत झाले आहे. गंभीर परिस्थितीची दखल घेत खासदार निलेश लंके यांनी स्वतः पूरग्रस्त भागात जाऊन पाहणी केली. ते पाण्यात उतरून नागरिकांपर्यंत पोहोचले, त्यांच्या हालअपेष्टा जाणून घेतल्या व आवश्यक मदतीचे आश्वासन दिले.

यावेळी खासदार लंके यांनी अहिल्यानगर महानगरपालिकेचे उपायुक्त विजयकुमार मुंडे यांना तात्काळ नुकसानीची नोंद घेऊन रेस्क्यू व आपत्ती व्यवस्थापन पथके पाठविण्याचे निर्देश दिले. तसेच महा वितरण अधिकाऱ्यांशी थेट संवाद साधून, पाण्यात करंट जाण्याचा धोका टाळण्यासाठी वीजपुरवठा सुरक्षित करण्याचे आदेश दिले. पाहणी दरम्यान नगरसेवक योगिराज गाडे, विक्रम राठोड, दिलदारसिंग बिर, गिरीश जाधव, मंदार मुले, राकेश बोगवट, प्रथमेश महिंदरकर, ओम काले, शुभम मिरांडे, महेश शेलके, अक्षय नागपूरे आदी मान्यवर उपस्थित होते.

### नागरिकांना दिलासा आणि आवाहन

खासदार लंके यांनी नागरिकांच्या तक्रारी शांतपणे ऐकून घेतल्या व परिस्थिती नियंत्रणात येईपर्यंत सुरक्षित स्थळी हलविण्याचा सल्ला दिला. पूरामुळे शेती, घरे व जनावरांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. सरकारने तात्काळ 'ओला दुष्काळ' जाहीर करून आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी खासदारांनी केली.

### हेलिकॉप्टरची मदत

शेवगाव तालुक्यातील देवटाकळी येथे रविवारी सकाळी पुरात अडकलेल्या नागरिकांची सुटका करण्यासाठी खासदार लंके यांच्याकडून लष्कर प्रशासनाशी संपर्क करून हेलिकॉप्टर ने मदत करण्याच्या सूचना दिल्या. त्यानंतर लष्कर प्रशासनाने तत्काळ हेलिकॉप्टर पाठवून नागरिकांना सुरक्षित ठिकाणी हलवले.

## महाराष्ट्रात पहिल्यांदाच शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी व्हाट्सअप ग्रुपच्या वतीने धरणे आंदोलन



**अक्षराज : बालासाहेब फुलपगार**

**दि.२९, पालम (परभणी) :** सामाजिक कार्यात नेहमीच अग्रेसर असणाऱ्या आपले पालम या व्हाट्सअप ग्रुप कडून सोमवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी ११ वाजल्यापासून पालम तहसील कार्यालयासमोर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यासाठी धरणे आंदोलन करण्यात आले. पालम तालुक्यात पावसाने थैमान घातले असून सर्वत्र नदी, नाल्यांना महापुर आल्या मुळे पिकात पाणी की पाण्यात पिक अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. या निर्माण झालेल्या परिस्थितीमुळे शेतकरी देशोधडीला लागला आहे.

अवघ्या चारच दिवसावर दसरा हा सण येऊन ठेपला आहे. परंतु शासनाकडून अद्याप पर्यंत घोषणा सोडता एक रुपयाही शेतकऱ्याला मिळालेला नाही. या सततच्या अतिवृष्टीमुळे संपूर्ण तालुक्यातील शेतकऱ्याचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे पंचनामे करने, मग अहवाल पाठवने व त्यावर विचार करून नंतर मदत मिळणे यात बराच काळ लोटणार आहे, शेतकरी तोपर्यंत तग धरू शकणार नाही त्यामुळे पालम तालुक्यात सरसकट ओलादुष्काळ जाहीर करावा, शेतकऱ्याला शासनाने कमीत कमी प्रति हेक्टरी ५०,००० रुपये तत्काळ मदत करावी. शेतकऱ्याला कर्जमाफी द्यावी, त्यामुळे किमान बँकेचा तगादा न लागता तालुक्यातील शेतकरी बिकट परिस्थितीतून सावरू शकेल. तसेच ज्याच्या घरात पुराचे पाणी शिरून नुकसान झाले आहे. त्याना शासनाने तात्काळ मदत करावी या साठी एक दिवसिय धरणे आंदोलन पालम तहसील कार्यालय समोर केले. यावेळी आपले पालमया व्हाट्सअप ग्रुपचे शेकडो सदस्य व तालुक्यातील शेतकरी बांधव व नागरिक तसेच विविध पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते. सदरील मागण्यांचे निवेदन पालम तहसील कार्यालयातर्फे नायब तहसीलदार भागवत तेलभरे यांनी स्वीकारले.

निवेदनावर शेकडो ग्रुपचे सदस्य व उपस्थित शेतकरी बांधव यांच्यासह विविध राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.निवेदनावर जर सरकारने पुढील ८ दिवसात जर काहीच कार्यवाही केली नाही तर यापुढे रास्तारोखो सारखे तीव्र आंदोलन करून तालुक्यात चक्काजाम करण्याचा इशारा दिला आहे. आपले पालम ह्या व्हाट्सअप ग्रुप तर्फे आजपर्यंत विविध समाज उपयोगी कार्य करण्यात आलेली आहेत ज्यात रक्तदान शिबिरे आयोजित करणे, सर्वस्व गमावलेल्या शेतकऱ्यांना आर्थिक मदत करणे, शहरात सीसीटीव्ही कॅमेरे लावण्यासाठी पोलिसांना आर्थिक हातभार देणे, शहीद स्वातंत्र्यसैनिकांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत देणे, कोल्हापूर येथील पूरग्रस्तांना आर्थिक मदत देण्यासाठी मदत फेरी उभारून ती तिथपर्यंत पोहोचती करणे, पालमच्या ग्रामीण रुग्णालयात रुग्णांना निर्जंतुक पाणी मिळावे यासाठी वॉटर फिल्टर देणे, या व या सारख्या अनेक सामाजिक उपक्रम हाती घेऊन यशस्वीपणे राबवलेली आहेत. सध्या हा ग्रुप अतिवृष्टीमुळे सर्व गमावलेल्या शेतकऱ्याच्या मागे ठामपणे उभा असून शासनाकडून जोपर्यंत त्यांना मदत मिळत नाही तोपर्यंत हा लढा चालूच ठेवणार आहे.

## पारनेर ग्रामीण पतसंस्थेतर्फे सभासदांना १० टक्के लाभांश - आ.दाते यांची माहिती




**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** पारनेर ग्रामीण पतसंस्थेची २२ वी वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच संस्थापक, चेअरमन आमदार काशिनाथ दाते यांचे अध्यक्षतेखाली मणकर्णिका लॉन्स पारनेर येथे संपन्न झाली. यावेळी संस्थेचे व्हा. चेअरमन सुरेश बोरुडे, संचालक बाळासाहेब सोबले, आर एस कापसे सर, लक्ष्मण डेरे, मयूर गांधी, अर्जुन गाजरे, राजेंद्र औटी, कृष्णा उमाप, सुभाष राठोड, दिलीप दाते, सुनील गाडगे, सुनंदा दाते, आशा तराळ तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुभाष थोरात उपस्थित होते. संस्थेच्या सुरुवातीला अहवाल सालात विधानपरिषद सदस्य आ.स्व.अरुण काका जगताप, अतिवृष्टी पूरपरिस्थितीमुळे मृत्युमुखी पडलेले नागरिक व संस्थेचे ज्ञात, अज्ञात सभासद दिवंगतांना श्रद्धांजली देण्यात आली. त्यानंतर संस्थेला सन २०२४ - २५ या आर्थिक वर्षात रुपये २ कोटी ५० लाख ९५ हजार ९२० निव्वळ नफा व ऑडिट वर्ग अ मिळाल्याचे पारनेर विधानसभा मतदारसंघाचे आमदार तथा संस्थापक अध्यक्ष काशिनाथ दाते यांनी वार्षिक सर्वसाधारण सभेत बोलताना सांगितले. संस्थेकडे २२ वर्षाच्या कालावधीत आज अखेर २३५ कोटी रुपयांच्या ठेवी जमा झालेल्या आहेत हे सभासदांनी संस्थेवर ठेवलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे. संस्थेची बँक गुंतवणूक १०७ कोटी असून स्थावर मालमत्ता ३ कोटी ८० लाख आहे. संस्थेमार्फत सभासदांना १० टक्के लाभांश जाहीर करण्यात आला, सभासदांना त्यांच्या गरजा पूर्ण करण्यासाठी व व्यवसायासाठी १५२ कोटी रुपयांचे कर्ज वितरण केलेले आहे. संस्थेमार्फत नियमित कर्ज हप्ता भरणाऱ्या १०५ कर्जदार सभासदांचा सन्मान चिन्ह व शाल देऊन सत्कार करण्यात आला. संस्थेचे अहिल्यानगर, पुणे, ठाणे व मुंबई जिल्हा कार्यक्षेत्र असून संस्थेच्या पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी, बेलवंडी फाटा, जामगाव, नारायण गव्हाण, आळेफाटा,सुपा,कामोठे, अहिल्यानगर, वनकुटे, ढवळपुरी, भोसरी, खडकवाडी, मांडवे खुर्द, पळशी व शिरूर अशा १७ शाखा सुरू आहेत. संस्थेचे चेअरमन काशिनाथ दाते यांनी सांगितले संस्थेच्या पारनेर, टाकळी ढोकेश्वर, जामगाव, कामोठे, खडकवाडी, आळेफाटा, शिरूर व सुपा येथे स्वमालकीच्या इमारती आहेत. संस्थेने पारनेर, टाकळी ढोकेश्वर, आळकुटी,सुपा बेलवंडी फाटा, जाम गाव, ढवळपुरी येथे सभासदांना लॉकर सुविधा उपलब्ध करून दिलेली आहे. वार्षिक सर्वसाधारण सभेच्या विषय परिपत्रकेवरील सर्व विषय एकमताने मंजूर करण्यात आले व सभा खेळीमेळीत संपन्न झाली. वार्षिक सर्वसाधारण सभेसाठी सर्व सभासद व कर्मचारी उपस्थितीत होते. चेअरमन सुरेश बोरुडे यांनी आभार मानले. सभेनंतर सभासदांना संस्थेमार्फत मिष्ठान्न भोजन देण्यात आले.

## तलासरी तालुक्यात कुर्जे धरणाचे दरवाजे उघडल्याने पूरस्थिती

### ७१ घरांचे नुकसान, आमदार विनोद निकोले यांनी केली पाहणी

**अक्षराज : निलेश कासट**

**दि.२९, तलसारी (पालघर) :** तलासरी तालुक्यातील वडवली परिसरात दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी पहाटे अचानक पूरस्थिती निर्माण झाली. मुसळधार पावसासह ऊर्जा धरणाचे दरवाजे जबाबदार अधिकाऱ्यांनी गावकऱ्यांना कोणतीही पूर्वसूचना न देता उघडल्याने नदीला पूर आला. या पूरामुळे वडवली व आसपासच्या पाड्यांतील एकूण ७१ घरांचे मोठे नुकसान झाले. नवापाडा येथील २७ घरे, ओझरपाडा २३ घरे, हडळपाडा १६ घरे, सवणे पाटीलपाडा ७ घरे व वंकास येथील ८ घरे पाण्याखाली जाऊन घरातील वस्तूंचे प्रचंड नुकसान झाले. टीव्ही, फ्रीज सारख्या वस्तूंसह जीवनावश्यक सामग्री पाण्याने भिजून खराब झाली आहे. घरांची जमीन ओली झाल्याने कुटुंबांना राहण्यालायक परिस्थिती उरलेली नाही.



या परिस्थितीची माहिती मिळताच आमदार विनोद निकोले यांनी आज सकाळी वडवली व प्रभावित पाड्यांची पाहणी केली. त्यांनी प्रशासनाला तातडीने मदत कार्य राबवण्याचे आदेश दिले. तसेच बेजबाबदार पद्धतीने धरणाचे दरवाजे उघडणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई केली जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. तत्काळ मदत म्हणून प्रशासनाकडून नुकसानग्रस्त ग्रामस्थांना जीवनावश्यक वस्तूंची किट वितरित करण्यात आली असून, संध्याकाळपर्यंत प्रत्येक घरात ताडपत्री पुरविण्यात येईल, असे गटविकास अधिकारी वैभव साबळे यांनी सांगितले. याशिवाय घरातील झालेल्या नुकसानीचा पंचनामा करून भरपाई देण्यात येईल, असे तहसीलदार अमोल पाठक यांनी आश्वासन दिले. या पाहणीवेळी माजी सभापती कॉ.नंदकुमार हाडळ, नगराध्यक्ष कॉ.सुरेश भोये, माजी सरपंच कॉ. सुनिता हाडळ, तहसीलदार अमोल पाठक, गटविकास अधिकारी वैभव साबळे, तसेच सर्कल, तलाठी, ग्रामसेवक आणि ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. अचानक आलेल्या या पूरामुळे ग्रामस्थांमध्ये संतापाचे वातावरण असून जबाबदार अधिकाऱ्यांवर कठोर कारवाईसह तातडीची मदत आणि दीर्घकालीन उपाययोजना करण्याची मागणी जोर धरत आहे.

# सवई भट यांच्या सुरेल स्वरांतून महाकाली महोत्सवात जागली भक्तिभावाची प्रभा

## उद्या निघणार भव्य नगर प्रदक्षिणा पालखी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.२९ चंद्रपूर :** आमदार किशोर जोरगेवार यांच्या संकल्पनेतून श्री महाकाली माता महोत्सव समितीच्या वतीने आयोजित श्री माता महाकाली महोत्सवाच्या पावन वातावरणात दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी सुप्रसिद्ध गायक सवई भट यांच्या भक्तीमय गायनाने भाविकांच्या अंतरंगाला स्पर्श केला. त्यांच्या सुरमधुर भजनांनी महोत्सव परिसर स्वरमंदिर बनले होते. आरतीच्या दिव्यांच्या लखलखाटात आणि जय माता दी च्या घोषात भजनांच्या सुरांनी भक्तिरसाचा दरबार रंगून गेला. तर महोत्सवाच्या तिसऱ्या दिवशी नागपूर विभागाचे पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील यांनी महोत्सवाला भेट दिली. कार्यक्रमाच्या प्रारंभी महाकाली मातेला महाआरती अर्पण करण्यात आली. त्यानंतर सवई भट यांनी आपल्या सुरेल आवाजात भक्तिगीते सादर करताच वातावरणात भक्तिभावाचे वारे दरवळू लागले. त्यांच्या प्रत्येक आलापात प्रार्थनेचा आविष्कार आणि प्रत्येक शब्दात मातृशक्तीची स्मृती जागृत झाली.

या भक्तिमय संगीतमहोत्सवाला हजारो भाविकांसह महोत्सव समितीचे अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार व विविध मान्यवर उपस्थित होते. श्री माता महाकालीच्या महाआरतीने महोत्सवाच्या तिसऱ्या दिवसाची सुरुवात झाली. त्यानंतर भजन कार्यक्रम पार पडला. लखमापूर येथील हनुमान मंदिर तर्फे सुंदरकांडचे आयोजन उत्साह आणि भक्तिमय वातावरणात पार पडले. त्यानंतर दुपारी २ वाजता पोलिस महानिरीक्षक संदीप पाटील यांनी महोत्सवस्थळी भेट देत मातेची आरती केली. यावेळी नवरात्री दरम्यान जन्मलेल्या कन्यांना संदीप पाटील यांच्या हस्ते चांदीचे नाणे देण्यात आले. तसेच ज्येष्ठ मायमाउलींचा सत्कार यावेळी करण्यात आला. तसेच कन्यापूजन आणि भोजन स्थळी भेट देत संदीप पाटील यांनी कन्यांना मातेचा दुपट्टा ओढला.

या कार्यक्रमात बोलताना संदीप पाटील म्हणाले की, आजची पिढी वाईट व्यसनाकडे ओढवली जात आहे. घरोघरी तणावाचे वातावरण निर्माण होत आहे. मात्र घरी आध्यात्मिक वातावरण ठेवल्यास या गोष्टी टाळल्या जाऊ शकतात, संस्कारातून व्यक्ती घडतो पुढे या व्यक्तींमुळे समाज घडत असतो. मातेला पूजणारा जगात भारत हा एकमेव देश आहे. येथे मातांचा सन्मान केला जातो. हीच परंपरा आ. किशोर जोरगेवार महाकाली महोत्सवाच्या माध्यमातून पुढे नेत आहेत. आ. किशोर जोरगेवार सामाजिक मन असलेले व्यक्तिमत्त्व आहे. त्यांचे अनेक सेवाभावी उपक्रम चंद्रपूरात सुरू आहेत. माता महाकालीचे दर्शन घेत असताना अदृश्य ऊर्जा जाणवली, याच उर्जेतून चंद्रपूरची सर्वांगीण उन्नती होणार असेही ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला श्री माता महाकाली महोत्सवाचे अध्यक्ष आ. किशोर जोरगेवार, निवृत्त जिल्हाधिकारी सतीश वासाडे, अप्पर पोलिस अधिकारी ईश्वर कातकडे, उपविभागीय पोलिस अधिकारी सुधाकर यादव, मनीष महाराज, श्री माता महाकाली महोत्सव समितीचे सचिव अजय जयस्वाल, विश्वस्त बलराम डोडाणी, राजू शस्त्रकार, अजय वैरागडे, सविता दंडारे, संजय बुरघाटे, प्रदीप माने, संदीप साळुंखे आदी मान्यवरांची मंचावर उपस्थिती होती.

**महाकाली महोत्सवात विविधतेत एकतेचे दर्शन चंद्रपूर –**

महाकाली महोत्सवाच्या रंगारंग कार्यक्रमात विविधतेत एकतेचे दर्शन घडले. या निमित्ताने सादर करण्यात आलेल्या लोककलांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. राजस्थान येथील नामांकित कलावंताने अप्रतिम भवई नृत्य सादर करून उपस्थितांची मने जिंकली. राजस्थानी संस्कृतीचे दर्शन घडवणाऱ्या या नृत्यप्रकारात सभागृहात टाळ्यांचा वर्षाव झाला. महाकाली महोत्सवाच्या माध्यमातून विविध प्रांतातील कला आणि संस्कृतीचा संगम अनुभवता आला.

**दिनांक ३० सप्टेंबर ला शहरातून निघणार भव्य नगर प्रदक्षिणा पालखी -**

उद्या सायंकाळी ४ वाजता महाकाली मंदिर येथून श्री माता महाकाली नगर प्रदक्षिणा पालखीला सुरुवात होणार आहे. ही पालखी गांधी चौक होत जटपूरा गेटला वळसा घालून पुन्हा महाकाली मंदिर परिसरात पोहोचणार आहे. पालखीत सुप्रसिद्ध जगराता लखबीर सिंग लख्खा यांचे सुपुत्र पन्ना सिंग गिल लख्खा यांचा रोड शो विशेष आकर्षण राहणार आहे. सोबतच श्री माता महाकालीच्या चांदीच्या मूर्तीचा व चांदीच्या पालखीचा नगर प्रदक्षिणेत सहभाग राहणार आहे.

गंगा आरती, पोतराजे नृत्य समूहांचा सहभाग, उत्तराखंड राज्यातील केदारनाथ धाम येथील झांज डमरू पथक, मध्यप्रदेश राज्यातील शिवतांडव अघोरी नृत्य, कर्नाटक राज्यातील पवनसुत प्रभू श्री बाहुबली हनुमान यांचे बोलके दृश्य, पंढरपूर येथील १०८ वारकरी यांचा टाळ, मृदंग गर्जना समूह, विविध प्रकारचे आदिवासी नृत्य, ढेमसा आदिवासी पारंपरिक नृत्य, रेला आदिवासी पारंपरिक नृत्य, ढोलशा आदिवासी पारंपारिक नृत्य, अश्वावर आरूढ नवदुर्गांचे बोलके दृश्य, तुतारी व अब्दार, मुलांची शस्त्र प्रात्यक्षिके, विविध समाजामार्फत झांकी, विविध सामाजिक संघटनांची झांकी, शहरातील विविध व्यायामशाळांच्या वतीने नगर प्रदक्षिणा पालखीत प्रात्यक्षिके, प्रसिद्ध बँड पथक, कलशधारी महिला यासह विविध देखाव्यांचा सहभाग राहणार आहे. तरी नागरिकांनी या पालखी सोहळ्यात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन समिती अध्यक्ष आमदार किशोर जोरगेवार यांनी केले आहे.

# पारनेर तालुक्यात तब्बल ३६ हजार ४४८ हेक्टर खरीप शेती पिकांचे प्रचंड नुकसान

## निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांचा घणाघात



**अक्षराज : वसंत रांधवण**

**दि.२९, पारनेर (अहिल्यानगर) :** अस्मानी संकटाने उद्ध्वस्त झालेल्या शेतकऱ्यांच्या वेदना अजूनही ताज्या असताना राज्य सरकारने केवळ ८५ रुपये प्रति गुंठा नुकसानभरपाई जाहीर केली आहे. ही मदत म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळल्यासारखी आहे, अशी तीव्र टीका निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी केली. तालुक्यात सततचा पाऊस व अतिवृष्टीमुळे पिकांना फटका बसलेल्या शेतकऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. दिनांक २७ सप्टेंबर रात्री व दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळी झालेल्या पावसामुळे तालुक्यात १३१ गावातील ४८ हजार २८७ शेतकऱ्यांचे ३५ हजार ४४८ हेक्टरवरील पिकांना पावसाचा दणका बसला आहे. कृषी विभागाच्या रविवारी केलेल्या पाहणीत ही माहिती समोर आली आहे. खरीप शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले. शेतकऱ्याच्या हातात आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने ५५३ कोटींचे विशेष पॅकेज जाहीर केले असले, तरी वास्तविक नुकसानीच्या तुलनेत ही मदत अत्यंत तुटपुंजे असल्याचे खिलारी यांचे मत आहे.

निलेश लंके प्रतिष्ठानचे अध्यक्ष बाळासाहेब खिलारी यांनी म्हटले केली आहे की, शासनाने जिल्हा कमिटीने मागणी शेतकऱ्यांचा विचार सहानुभूतीपूर्वक करून भरीव निधीची तरतूद करावी अन्यथा जिल्हाभर तीव्र आंदोलन उभारले जाईल, असा इशाराही देण्यात आला. प्रतिष्ठानच्या वतीने केलेल्या मागण्यांमध्ये अतिवृष्टीने शेती पिके नष्ट झाल्यामुळे शेतमजुरांचाही रोजगार हिरावल्या गेला आहे, म्हणून त्यांचाही अतिवृष्टीबाधितांमध्ये समावेश करून शासकीय मदत देण्यात यावी. पीकविमा योजनेअंतर्गत तातडीने शेतकऱ्यांना विमा अनुदान द्यावे. तसेच नदी – नाल्यालगत खरडून गेलेल्या शेती जमिनींचे सरकारमार्फत दुरुस्ती करून देण्यात यावी. जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्याला संकटाच्या काळात सरकारकडून खरी आधाराची गरज आहे. जर शासनाने भरीव नुकसानभरपाई जाहीर केली नाही, तर शेतकऱ्यांचा आक्रोश आगामी दिवसांत रस्त्यावर उतरलेला दिसेल, असेही बाळासाहेब खिलारी यांनी स्पष्ट केले आहे.

**सरसकट पंचनामे करा**

पारनेर, भाळवणी, सुपा, टाकळी ढोकेश्वर, पळशी पळवे खुर्द या महसूल मंडलात दिनांक २७ सप्टेंबर दुपारी ते दिनांक २८ सप्टेंबर २०२५ रोजी सकाळ दरम्यान तब्बल ५८.२ मिलीमीटर पावसाची नोंद झाली. झालेल्या अतिवृष्टीमुळे पारनेर तालुक्यातील १०० टक्के क्षेत्र बाधीत झाले आहे. त्यामुळे शासनाने सरसकट पंचनामे करून शेतकरी वर्गाला नुकसानभरपाई द्यावी, अशी मागणी शेतकरी करत आहेत.

# शेतकऱ्यांच्यासह ग्राहकांचे हित डोळ्यासमोर ठेवून खरेदी विक्री संघाची यशस्वीपणे वाटचाल

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.२९, पाटण (सातारा) :** शेतकऱ्यांच्यासह ग्राहकांचे हित डोळ्यासमोर ठेवून पाटण तालुका खरेदी विक्री संघ यशस्वीपणे वाटचाल करीत आहे. शेतकऱ्यांनी पारंपरिक शेतीत सुधारित नवनवीन तंत्रज्ञानाचा अवलंब करून आपले उत्पादन वाढविले पाहिजे. शेतीसाठी आवश्यक असलेले खात्रीशीर खत खरेदी विक्री संघ शेतकऱ्यांसाठी उपलब्ध करून देत आहे. त्याच लाभ घेतला पाहिजे. शेतीसाठी खात्रीशीर बी-बियाणे, पशुखाद्य देखील उपलब्ध करून देत आहे .तसेच शेतीकामासाठी जर्मन टुल्सच्या अद्ययावत साधनांचा वापर करावा. तालुक्यातील शेतकऱ्याच्यासाठी मेळावे घेऊन नवीन तंत्रज्ञानाची ओळख करून दिली पाहिजे. यासाठी शेतकऱ्यांचे मेळावे घेण्यासाठी पुढाकार घ्यावा असे आवाहन माजी सार्वजनिक बांधकाम मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांनी केले. येथील पाटण तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ते बोलत होते. यावेळी कोयना एज्युकेशन सोसायटीचे जनरल सेक्रेटरी अमरसिंह पाटणकर, विविध संस्थांचे चेअरमन, संचालक सभासद यांची उपस्थिती होते.विक्रमसिंह पाटणकर म्हणाले की, कर्मचारी आणि संचालक पाटण तालुका खरेदी विक्री संघ विविध शाखांच्या माध्यमातून लोकाभिमुख सेवा देत आहे.

शासनाच्या शेतकऱ्याच्या योजना वाढीवस्ती वरील शेतकऱ्याच्या पर्यंत पोहचल्या पाहिजेत. तालुक्यातील शेतकऱ्याचा आज ही खरेदी विक्री संघावर विश्वास आहे तो अधिक वाढला पाहिजे असे मत व्यक्त केले.यावेळी चेअरमन अँड.अविनाश जानुगडे म्हणाले, केवळ आर्थिक फायदा मिळवण्यासाठी संस्था चालविली जात नाही. शेतकरी हित डोळ्यासमोर ठेवून संस्था काम करते. संस्थेस ऑडिट अ: वर्ग मिळाला आहे. सी.एन.जी पॉईंट देखील लवकर सुरू करण्याच्या संकल्प आहे. शेतकऱ्यांसह, संघाच्या ग्राहकांना योग्य दरात खात्रीशीर सेवा देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.

अमरसिंह पाटणकर म्हणाले की, माजी मंत्री विक्रमसिंह पाटणकर यांचे मार्गदर्शना खाली संघ प्रगती करत आहे. शेतकऱ्याचे जीवनमान उंचाविण्यासाठी त्यांना योग्य खते , बी बियाणे आणि शेती उपयोगी वस्तु संघमार्फत देण्याचे काम करतो आहे. त्यासाठी प्रत्येक सभासद शेतकरी यांनी आपल्या संघातून खरेदी केली पाहिजे. अजून संघ प्रगती पथावर घेऊन जाण्यासाठी शेतकरी आणि सभासदाचे योगदान हवे आहे. यावेळी माजी मंत्री पाटणकर यांच्या हस्ते हस्ते चांगले काम करणाऱ्या शाखाप्रमुख आणि त्याचे सहकारी यांच्या सत्कार केला.यावेळी महेंद्र मगर, नथुराम मोरे, हणमंत माने ,हिंदुराव शिर्के, प्रमोद देशमुख, प्रताप काळे, शशिकांत पाटील, किसन डिगे, रामचंद साळुंखे, सुरेश डूबल, अनिल डाकवे, रामचंद झोरे, भानुदास सावंत, अमरसिंह पाटील, लता मोरे, अर्चना पाटणकर, कांचन साळुंखे, याचे सह , पाटण अर्बन बँकेचे



चेअरमन बाळासाहेब राजे महाडिक संचालक दिनकर घाडगे, माजी पाटण पंचायत समितीचे सदस्य रंगराव जाधव, मोरणा नागरीचे चेअरमन संजय हिरवे, कोयना कृषकचे चेअरमन नारायण सत्रे, श्रीराम नागरी पतसंस्थेचे चेअरमन हिंदुराव सुतार, माजी चेअरमन विलास क्षीरसागर, दीपक पाटणकर, पाटण अर्बन बँक व्यवस्थापक के आर शिंदे, पाटण तालुका खरेदी विक्रीचे माजी संचालक महादेव भोसेल,अरविंद शिबे . जयवंतराव गव्हाणे,जयवंत सुर्वे, कृष्णा शिंदे , लहू माने, याचे सह मोठ्या संख्येने सभासद हजर होते. अँड.अविनाश जानुगडे यांनी अहवाल वाचन केले.प्रभारी व्यवस्थापक रणजित पाटणकर यांनी नोटीस वाचन केले. संचालक हणमंत माने यांनी सूत्रसंचालन केले. संचालक शशिकांत पाटील यांनी आभार मानले.

# थोडक्यात

## दामिनी पथकाची प्रकाश हायस्कूलला भेट व विद्यार्थीनींशी संवाद




**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.२९, नागपूर :** नागपूर जिल्ह्याच्या रामटेक तालुक्यातील मनसर येथील प्रकाश हायस्कूल अँड ज्युनिअर कॉलेज कान्द्री माईन येथे आज सोमवार, दिनांक २९ सप्टेंबर २०२५ रोजी दामिनी पथकाने भेट देऊन विद्यार्थीनींशी संवाद साधला. यात विद्यार्थ्यांना सुरक्षेबाबतचे धडे व सायबर सुरक्षा बाबत मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे तर प्रमुख अतिथी म्हणून पोलीस उपनिरीक्षक धनश्री पाटणकर व हवालदार इंगोले उपस्थित होते.

पोलीस उपनिरीक्षक धनश्री पाटणकर यांनी विद्यार्थ्यांना सुरक्षतेबाबत अनेक माहिती दिली. विद्यार्थ्यांनी स्वतःहून स्वतःची सुरक्षा करावी. अडचण आल्यास त्यासंदर्भातील माहिती पोलिसांना व शिक्षकांना द्यावी. आपली दिवसभराची दिनचर्या आपल्या आई-वडिलांना सांगावी. वायफळ बाबींकडे लक्ष न देता विद्यार्थ्यांनी अभ्यासाकडे जास्तीत जास्त लक्ष द्यावे, असे आवाहन पोलीस उपनिरीक्षक श्रीमती पाटणकर यांनी केले. मुख्याध्यापक मिलिंद वानखेडे यांनी विद्यार्थ्यांनी स्वयंशिस्तीत वागावे तसेच शाळेतील तक्रार पेटीचा वापर करावा असे आवाहन केले. कार्यक्रमाचे संचालन कामिनी पाटील यांनी तर उपस्थितांचे आभार अनिता खंडाईत यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी श्याम गासमवार, विजयकुमार लांडे, अशोक नाटकर, प्रशांत सरपाते, सुचिता बिरोले, ज्योत्स्ना मेश्राम, अनिता बागडे, बसत ठकराले, मिलिंद वाघमारे, प्रभाकर खंडाते यांनी सहकार्य केले.

## भवानी तांडा येथे पुरामध्ये ३५ शेळ्या वाहून गेल्या

### उप विभागीय अधिकारी, तहसीलदारांनी घेतली तातडीने दखल


**अक्षराज : अशोक लोणीकर**

**दि.२९, मुखेड (नांदेड) :** नांदेड जिल्ह्यात सर्वत्र पावसाचे तांडव सुरूच असून दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी मुखेड तालुक्यातील भवानी तांडा येथे असाच प्रकार घडला. सायंकाळी पडलेल्या मुसळधार पावसामुळे आलेल्या पुरामुळे ३५ शेळ्या वाहून गेल्या. यामुळे शेतकरी जयराम धनाजी पवार यांचे लाखो रुपयांचे नुकसान झाले असून पवार कुटुंबावर दुःखाचे डोंगर कोसळले आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, दिनांक २६ सप्टेंबर २०२५ रोजी संध्याकाळी सुमारे ५ ते साडेपाचच्या सुमारास पवार यांची लहान मुलगी शिवारात शेळ्या चारून परत घराकडे येत होती. पण तिच्या वाटेवर जोरदार पावसामुळे वोढ्याला अचानक पूर आला. ओढा ओलांडताना संपूर्ण कळप पाण्यात अडकला आणि काही क्षणातच होत्याचे नव्हते झाले. क्षणातच ३५ शेळ्या डोळ्यासमोर वाहून गेल्या. यापैकी दोन शेळ्या मृत अवस्थेत आढळून आल्या, तर उवरित आद्यापी बेपता आहेत. या घटनेची माहिती मिळताच तहसीलदार राजेश जाधव यांनी तलाठी आणि मंडळ अधिकारी यांना तातडीने घटनास्थळी भेट देऊन पंचनामा करण्याचे आदेश दिले त्यानुसार पंचनामे करण्यात आले. पशुसंवर्धन विभागाच्या अधिकाऱ्यांनी ही घटनेची पाहणी करून पंचनामा केला आहे. पवार कुटुंबाला शासनाकडून शक्यती सर्व मदत करण्यात येईल असे आश्वासन तहसिलदर राजेश जाधव यांनी दिले आहे. जयराम पवार यांच्या शेळीपालन व्यवसाय हा त्यांचा कुटुंबाचा उपजीविकेचा मुख्य आधार होता. या दुर्दैवी घटनेने त्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले असून त्यांना तातडीची मदतीची गरज आहे.

## मराठवाड्यातील पूरग्रस्तांच्या मदतीला ठाकरेंची शिवसेना धावली

### केदार दिघेंकडून मोफत औषधांचा पुरवठा



**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.२८, ठाणे :** मराठवाड्यात निर्माण झालेल्या गंभीर पूरस्थितीमुळे शेतकरी आणि नागरिक हवालदिल झाले आहेत. अनेकांचे संसार रस्त्यावर आले असून शेतीचे अतोनात नुकसान झाले आहे. या संकटकाळात मदतीसाठी शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष पुढे सरसावला असून, खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील स्थानिक शिवसैनिकांसह अहोरात्र मदत कार्यात सक्रिय झाले आहेत. याच पार्श्वभूमीवर, पूरग्रस्त भागातील नागरिकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी धर्मवीर आनंद दिघे यांचे पुतणे आणि शिवसेनेचे ठाणे जिल्हाप्रमुख केदार दिघे यांनी मोठा पुढाकार घेतला आहे. आनंद दिघे युवा प्रतिष्ठान व शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या वतीने मराठवाड्यातील पूरग्रस्त बांधवांसाठी मोफत औषध पुरवठा करण्यात येणार आहे. यासाठी औषधांनी भरलेला एक मोठा टेम्पो पुणे येथून पूरग्रस्त भागाकडे रवाना झाला आहे. यावेळी पक्षाचे उपनेते व पुणे जिल्हा संपर्क प्रमुख सचिन अहिर, पुणे जिल्हा प्रमुख उल्हास शेवाळे, राज्य संघटकवसंतमोरे, शहर प्रमुख संजय मोरे, युवासेना जिल्हाप्रमुख सागर मोडक, सुजित थेवरे, नितीन गावडे, प्रतिष्ठानचे अभिषेक जाधव, रोहन आंब्रे, संजय पाठक तसेच अन्य पदाधिकारी यांच्या उपस्थितीत हा टेम्पो रवाना झाला. याविषयी बोलताना केदार दिघे म्हणाले, पुराच्या पाण्यामुळे अडचणीत सापडलेल्या आपल्या बांधवांपर्यंत आरोग्यविषयक मदत पोहोचवणे हे आमचे कर्तव्य आहे. धर्मवीर आनंद दिघे यांच्या संस्कार आणि शिकवणीनुसार आम्ही हे मदतकार्य करत आहोत.

खासदार ओमराजे निंबाळकर आणि आमदार कैलास पाटील हे स्थानिक पातळीवर नागरिकांना धीर देत असून, मदतकार्यावर जातीने लक्ष ठेवून आहेत. शिवसेनेच्या वतीने पूरग्रस्त नागरिकांना दिलासा देण्याचा हा प्रयत्न आहे असे केदार दिघे म्हणाले.

## जिल्ह्यातील पंचायत समिती सभापती पदांचे आरक्षण सोडत कार्यक्रम ७ ऑक्टोबर रोजी

**अक्षराज : बाळू धायगुडे**

**दि.२९, खंडाळा (सातारा) :** सातारा जिल्हयाच्या अधिकार क्षेत्रातील पंचायत समित्या गठीत होऊन लगतनंतरच्या दिवसापासून सुरु होणाऱ्या अडीच वर्षाच्या कालावधीकरिता पंचायत समिती सभापती पदांचे आरक्षण सोडत कार्यक्रम दिनांक ०७ ऑक्टोबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता नियोजन भवन जिल्हाधिकारी कार्यालय सातारा येथे होणार आहे. तरी सातारा जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधी व नागरिक यांनी उपस्थित रहावे, असे आवाहन उपजिल्हाधिकारी (महसूल) विक्रांत चव्हाण यांनी केले आहे. ग्रामविकास विभागाकडील ९ सप्टेंबर २०२५ रोजीच्या पत्रानुसार सातारा जिल्ह्यातील पंचायत समिती सभापती पदासाठीची प्रवर्गनिहाय संख्या निश्चित करणेत आलेली आहे. यानुसार सातारा जिल्हयामधील ११ पंचायत समित्यांचे सभापती प्रवर्गनिहाय आरक्षण पुढीलप्रमाणे आहे. अनुसुचित जाती प्रवर्ग (महिला) ०१, नागरिकाचा मागास प्रवर्ग (महिला) ०२, नागरिकाचा मागास प्रवर्ग (खुला) ०१, सर्वसाधारण प्रवर्ग (महिला) ०३, सर्वसाधारण प्रवर्ग (खुला) ०४ अशी एकूण ११ पदे आरक्षित करण्यात आलेली आहेत.